# संघर्षातून उभा राहिलेला 'सारा' समूह

संघर्ष हा प्रत्येकाच्याच जीवनाचा अविभाज्य भाग आहे. जीवनातील प्रत्येक टप्प्यावर संघर्ष करीत यशस्वीपणे मार्ग काढणारे हजारो लोक आपल्या अवतीभोवती दिसतील आणि दुसरीकडे संघर्षाला सामोरे न जाता, तडजोड करणारे, माघार घेणारेही दिसतील. यशस्वी जीवनाची प्रत्येकाचीच कहाणी वेगळी असते.

प्रत्येकाच्या सुखाच्या, समाधानाच्या व्याख्या, कल्पना वेगळ्या असतात, मात्र काही लोक असे म्हणतात, की त्यांच्यापासून प्रेरणा घ्यावी, असे त्यांच्या सहवासातील प्रत्येकाला वाटते. त्यांच्या या यशामागे त्यांनी केलेला संघर्ष केवळ कोणा एका व्यक्तीला नाही, तर समाजासमोर आदर्श वाटू लागतो. आज केवळ औरंगाबाद आणि मराठवाड्याच नाही, तर राज्यभरात नाव झालेल्या 'सारा बिल्डर्स अँण्ड डेव्हलपर्स'चे चेअरमन सीताराम अग्रवाल हे अशाच यशस्वी व्यक्तींपैकी एक.

दररोज हातातोंडाशी गाठ असलेल्या कुटुंबात सीताराम अग्रवाल यांचा जन्म झाला. बुलढाणा जिल्ह्यातील सोनाळा हे त्यांचे गाव. वडिलांचे किराणा दुकान होते. त्यातून मिळणाऱ्या तुटपुंज्या उत्पन्नावर त्यांचे घर चालायचे. त्यांना तीन भाऊ. सीताराम दुसऱ्या क्रमांकाचे. दहावीनंतर पॉलिटेक्निकच्या अभ्यासक्रमासाठी (सिव्हिल) वर्धा येथे नंबर लागला. वडील महिन्याला पन्नास रुपये पाठवत. अभियांत्रिकीची पदविका मिळवून नांदेडच्या अप्पर पैनगंगा प्रकल्पावर हदगाव उपविभागात उपअभियंता म्हणून त्यांनी नोकरीस सुरुवात केली. पण त्यांनी नोकरीत न अडकता स्वतःच्या व्यवसाय करण्याचे ठरवले होते. जेमतेम वर्षभर ही नोकरी केली. याच दरम्यान औरंगाबादला त्यांचे मामा पुरुषोत्तमजी अग्रवाल यांच्या अजंठा फार्मा कंपनीचे बांधकाम चिकलठाणा औद्योगिक वसाहतीत सुरू व्हायचे होते. हे काम करण्याची संधी त्यांना मिळाली आणि या संधीचे सोने करीत अतिशय कमी वेळेत त्यांनी चांगले काम करून दिले. पुढे मामांच्या मदतीने ते पूर्णवेळ बांधकाम व्यवसायात उतरले. अप्पर पैनगंगा प्रकल्प धरणाच्या साइटवरील छोटी मोठी विकासकामेही नंतर त्यांना मिळाली. हे काम दोन वर्षे केले. १९८० मध्ये लग्न झाल्यानंतर औरंगाबादेत स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय त्यांच्या जीवनाला वेगळी कलाटणी देणारा ठरला. औरंगाबादेत सिडकोची अनेक कामे सुरू होती. सिडको कार्यालयाची संरक्षक भिंत आणि अन्य लहान-मोठी कामे अग्रवाल यांना मिळाली. १९८० मध्ये २६ हजार रुपयांचे पहिले काम त्यांनी केले.

१९८३ मध्ये त्यांना नाशिक सिडकोचे काम मिळाले. १९८३ ते ८६ दरम्यान त्यांनी नाशिक येथे काम केले, मात्र या वेळी त्यांना आर्थिक फटका सहन करावा लागला. १९८६ ते १९९४ हा काळ त्यांच्यासाठी कसोटी पाहणारा ठरला. संकटे एकाच वेळी येतात. याचा प्रत्यय त्यांना आला, मात्र संकटाना डगमगून न जाता आपला संघर्ष सुरूच ठेवला. त्यांच्याकडे एक ट्रक होता. त्यातून त्यांनी बांधकाम व्यावसायिकांना पुरवठा करायला सुरुवात केली.



श्री. सितराम अग्रवाल

ट्रकचा एखादा पार्ट नादुरुस्त झाला, तर तो बदलणेही शक्य होत नसे, असा हा आर्थिक संकटांचा काळ. भंगारामधून जुना पार्ट मिळवून तो ट्रकला लावायचा आणि काम सुरू ठेवायचे. यामुळे ट्रकही वारंवार नादुरुस्त व्हायचा. या काळात त्यांची पत्नी छायादेवी त्यांच्यामागे किंबहुना बरोबरीने उभ्या राहिल्या.

घर चालविण्यासाठी त्यांनीही प्रयत्न सुरू केले. लिक्विड सोप तयार करून ते घरोघर विकण्याचा व्यवसाय सुरू केला.दोन मुले रुपेश आणि नीलेश या दोघांचे शिक्षणही सुरू होते. सिडकोतील एका इंग्रजी शाळेमध्ये मुलाला प्रवेश घेण्यासाठी ते गेले, मात्र एक हजार रुपये नसल्याने मुलाला प्रवेश नाकारण्यात आला. अशा बिकट परिस्थितीत त्यांनी जिद्द सोडली नाही. वाळू, खडी, सिमेंट असे साहित्य ते पुरवत. बिकट आर्थिक परिस्थितीमुळे त्यांच्यावर कर्जही झाले होते.

१९९४ ते १९९८ या काळात त्यांनी आपल्यावरील सर्व कर्ज फेडून टाकले. १९९७ मध्ये अजंठा फार्मांचे वाळूज येथील फॅक्टरीचे काम त्यांना मिळाले. आयुष्यात वर येण्याची ही चांगली आणि कदाचित शेवटी संधी हाती आली, याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे त्यांनी झोकून देऊन काम केले. हाच त्यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट ठरला. याच कंपनीचे रशियात काम सुरू होते. तेथील कामही त्यांनी स्वीकारले आणि पंधरा दिवस रशियात, तर पंधरा दिवस औरंगाबादेत काम करून त्यांनी दोन्ही कामे पूर्ण केली. ही कामे यशस्वीपणे झाल्यानंतर त्यांच्या मामांचे सिडकोतील क्षेत्रामध्ये त्यांचा प्रवेश झाला. या प्लॉटवर त्यांनी गंगोत्री कॉम्प्लेक्स बांधले. यातील फ्लॅट मोठे असल्याने विकले जात नव्हते, म्हणून त्यांनी स्वतःच्या प्लॉटवर छोट्या फ्लॅटची योजना आखली. देवगिरी बँकेने त्यांना कर्ज दिले आणि ही योजना अतिशय यशस्वी ठरली. या दरम्यान गंगोत्री मधील फ्लॅटही विकले गेले आणि एक वर्षात त्यांनी देवगिरीचे कर्ज फेडले. यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. सिडकोतील एन एक मधील सारानगर गारखेड्यातील एमराल्ड सिटी रणजितनगरमधील सारा प्राईड हे तीन प्रकल्प त्यांनी पूर्ण केली. इतिहास घडविला. यानंतर सारा गार्डन, सारा हार्मनी, सारा सिद्धी, सारा वैभव, सारा वृंदावन, सारा कीर्ती, सारा सिटी, सारा भूमी आदी पंचवीसपेक्षा जास्त प्रकल्प त्यांनी पूर्ण केले. तुळजापूर येथे शंभर घरांची सारा वैभव ही योजना तसेच फुलंब्री, कन्नड आदी ठिकाणीही त्यांनी गृहप्रकल्प साकारले.

औरंगाबाद शहराच्या विकासाच्या दुसऱ्या टप्प्यात त्यांनी आपला व्यवसाय भरभराटीला आणला. आणि एकाच दिशेने होत असलेली शहराची वाढ चहुबाजूंनी करण्याचा मान मिळविला. शेंद्रा, जटवाडा, हर्सूल, वाळूज, गारखेडा, पैठण रोड आदी भागातील पहिल्या योजना साकारण्याचा मान साराकडे जातो. त्या अर्थाने ते शहर विकासातील ट्रेंड सेंटर बनले आहेत. पुण्याजवळ चाकण येथे ७० एकर परिसरात त्यांचा चार हजार घरांचा भव्य टाऊनशिप प्रकल्प आकारला येत असून आतापर्यंत यातील तेराशे घरे पूर्ण झाली आहेत. पुण्यातही सर्वांत अगोदर सात मजली आणि नंतर अकरा मजली इमारतीला परवानगी मिळविण्याचा मान त्यांच्याकडे जातो.

सारा बिल्डर्सने आजपर्यंत जवळपास सहा हजार कुटुंबाना स्वतःचे घर दिले आहे. प्रत्येक उत्पन गटाच्या गरजा आणि त्यांची क्षमता ओळखून तशा प्रकारची घरे तयार करण्याकडे त्यांचा कटाक्ष असतो.